प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २०.१०.२०२०**

# नवी मुंबईतील नागरी सेवा आता सिडकोच्या मुख्य दक्षता अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेत

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या निर्देशानुसार सिडकोच्या इतिहासात प्रथमतःच नवी मुंबईतील नागरी सेवा आता सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी श्री. शशिकांत महावरकर यांच्या कार्यकक्षेअंतर्गत समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका यांच्याशी आवश्यक तो समन्वय साधून नवी मुंबईतील नागरी सेवेसंदर्भातील प्रश्न सोडवण्यात येणार आहेत.

नागरी सेवेसंदर्भातील सर्व प्रश्न मुख्य दक्षता अधिकारी म्हणजेच आयपीएस कॅडरच्या अधिकाऱ्याच्या कार्यकक्षेत आल्यामुळे आता नवी मुंबईतील सर्व प्रकारच्या नागरी सेवांसंदर्भातील प्रश्नांवर विशेष लक्ष देणे शक्य होणार आहे. यामुळे नागरिकांच्या नागरी सेवेसंदर्भातील समस्यांवर आणखीन जलद गतीने व सुलभतेने उपाययोजना करणे शक्य होणार आहे. या सर्व प्रक्रीयेमध्ये सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी हे नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधून नागरी सेवांमध्ये आणखीन उत्कृष्टता आणण्याचा प्रयत्न करणार आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको